# प्रकरण चौथे

## सोलापूरातील बालकामगारांच्या आर्थिक समस्या

४. प्रस्तावना

४.१ बालकामगारांच्या कुटूंबातील सदस्य संख्या

४.२ बालकामगारांचे वडीलांचे कामाचे विवरण

४.३ बालकामगारांच्या मातांचे कामाचे विवरण

४.४ बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तिंचे कामाचे विवरण

४.५ बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुप

४.६ बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप

४.७ बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे कामाचे स्वरुप

४.८ बालकामगारांच्या वडीलांच्या मासिक उत्पन्नाची पातळी

४.९ बालकामगारांच्या मातांची मासिक उत्पन्नाची पातळी

४.१० बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तिंच्या उत्पन्नाची पातळी

४.११ बालकामगारांचे काम करण्याचे स्वरुप

४.१२ बालकामगारांना मिळणाऱ्या वेतनाचा कालावधी

४.१३ बालकामगारांना मिळणारे वेतन

४.१४ बालकामगारांना अतिरिक्त काम केल्यामुळे मिळणारे उत्पन्न

४.१५ बालकामगारांना मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोत

४.१६ बालकामगारांचा स्वत:वरचा खर्च

४.१७ बालकामगारांद्वारा केली जाणारी बचत

४.१८ बालकामगारांद्वारा केली जाणारी बचतीची पातळी

# प्रकरण चौथे
# सोलापूरातील बालकामगारांच्या आर्थिक समस्या

## ४. प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरण हा संशोधनाचा मुख्य गाभा आहे. कारण, प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची आर्थिक समस्यांचा, बालकामगारांच्या पुनर्वसनाचा शोध घेतला आहे. बालकामगारांची आर्थिक, समस्या, बालकामगारांचे पुनर्वसन अभ्यासताना प्रामुख्याने अनुसूचीद्वारे विचारण्यात आलेल्या प्रश्नांतून व मिळालेल्या प्राथमिक माहितीतून सोलापूरातील बालकामगारांच्या समस्या व पुनर्वसनाची मांडणी केली आहे. सोलापूरातील एकूण २६० बालकामगारांची अभ्यासासाठी निवड केली आहे. या २६० बालकामगारांमध्ये सोलापूर शहरातील बालकामगार बहूलता क्षेत्रातील १३० बालकामगार व राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पातील विशेष शाळेतील शैक्षणिक पुनर्वसनातील १३० बालकामगार असे एकूण २६० बालकामगारांची निवड करण्यात आली आहे. या २६० बालकामगारांच्या अभ्यासावरुन निघालेले निष्कर्ष संपूर्ण सोलापूर जिल्हयासाठी लागू केले आहेत. एकूणच प्रस्तूत प्रकरणात अतिशय सुक्ष्मरित्या सोलापूरातील बालकामगारांची आर्थिक स्थिती, समस्या, व त्यांचे पुनर्वसनाची स्थिती स्पष्ट केली आहे.

## ४.१ बालकामगारांच्या कुटूंबातील सदस्य संख्या :

साधारणत: कुटूंबाच्या सदस्य संख्येवरुन कुटूंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती स्पष्ट होते. कुटूंबाचा आकार त्यांच्या मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम करीत असतो. कुटूंबाचा आकार मोठा असल्यास दारिद्रय वाढण्याची व बालकामगार निर्मितीची शक्यता असते. म्हणूनच प्रस्तूत अध्ययनात बालकामगारांच्या कुटूंबाच्या सदस्य संख्येचा शोध घेणे महत्वाचे आहे. पुढील तक्ता क्र. ४.१मध्ये बालकामगारांच्या कुटूंबातील सदस्य संख्या स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ४.१**

**बालकामगारांच्या कुटूंबातील सदस्य संख्या.**

| अ. क्र. | कुटूंबातील सदस्यांची संख्या | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ३ | ५ | १.९ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | ४ | ३४ | १३.१ |
| ३. | ५ | ६५ | २५.० |
| ४. | ६ | ५२ | २०.० |
| ५. | ७ | ३८ | १४.६ |
| ६. | ८ | २९ | ११.२ |
| ७. | ९ | १२ | ४.६ |
| ८. | १० | १२ | ४.६ |
| ९. | ११ | १ | ०.४ |
| १०. | १२ | ९ | ३.५ |
| ११. | १८ | ३ | १.२ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखात बालकामगारांच्या कुटूंबातील सदस्य संख्या दर्शविण्यात आले आहे.

**आलेख क्र. ४.१**

**बालकामगारांच्या कुटूंबातील सदस्य संख्या**




तक्ता क्र. ४.१ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांची कौटूंबिक पातळी दर्शविली आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये कुटूंबाची सदस्य संख्या ३ असलेले १.९% आहे. बालकामगारांची कुटूंब सदस्य संख्या ४ असलेले १३.१% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या ५ असलेले २५.०% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या ६

असलेले २०.०% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या ७ असलेले १४.६% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या ८ असलेले ११.२% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या ९ असलेले ४.६% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या १० असलेले ४.६% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या ११ असलेले .४% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या १२ असलेले ३.५% आहेत. बालकामगारांच्या कुटूंब सदस्य संख्या १८ असलेले १.२%आहेत. याचा अर्थ असा की, बालकामगारांच्या कुटूंबातील सदस्य संख्या ५ आणि ६ असलेल्या कुटूंबाची संख्या सर्वात जास्त म्हणजे २५% आणि २०% आहे. त्याचप्रमाणे कुटूंब सदस्य संख्या ७ ते ८ संख्या असलेले १४.६% आणि ११.२% आहे. आणि उरलेले ९ ते १८ कुटूंब सदस्य संख्या असलेले बालकामगारांचे कुटूंब १४.३% आहे. बालकामगारांच्या कुटूंबातील लोकांचे असे मत असते की, जितके जास्त अपत्य असतील तितकी जास्त कमाई होईल. म्हणून ते मुल थोडे बहूत समजण्याच्या स्थितीत झाल्यावर त्याला श्रम बाजारात काम करण्यासाठी पाठवतात. कुटूंब प्रमुख उत्पन्न कमी असल्यामुळे ते घरातील इतर सदस्यांना सुद्धा कामावर पाठवतात. अशिक्षितपणा असल्यामुळे ते कुटूंब नियोजन सुद्धा करुन घेत नाहीत. कुटूंब सदस्य संख्या जास्त असल्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. राहण्यासाठी घराची व्यवस्था चांगली असत नाही. बहूतांशी कुटूंब घाणेरडया वस्तीत झोपडपट्टीत राहतात. कुटूंब सदस्य संख्या जास्त असल्याने त्यांना अत्यंत अडचणीमध्ये राहावे लागते. स्वच्छतेच्या अडचणी निर्माण होत असतात. अनेक रोगांचाही सामना करावा लागतो. उत्पन्न कमी असल्याने कुटूंब सदस्य संख्या जास्त असल्याने सर्वांना पौष्टीक जेवण तर दुर पोटभर जेवण सुद्धा मिळत नाही. कुटूंब सदस्य जास्त असल्याने बालकामगार मोठे झाल्यावर जेव्हा त्यांचे विवाह होतात तेव्हा ते सुद्धा जास्त अपत्यांना जन्म देतात म्हणजे ज्या चक्रात ते अडकलेले आहेत त्या चक्रात पुढील पिढीला सुद्धा या चक्रात अडकवतात. म्हणजे दारिद्रयात जन्मतात दारिद्रयात जगतात आणि दारिद्रयातच मरतात. सदस्य संख्या ९ ते १८ असलेले कुटूंबातील बालकामगारांची स्थिती अत्यंत गंभिर व विचार करण्यासारखी आहे.

## ४.२ बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे विवरण :

निवडलेल्या बालकामगारांपैकी जवळपास ९२ टक्के बालकामगारांचे वडील काम करत असूनही तेथे बालकांना काम करावे लागत आहे ही खेदाची गोष्ट आहे. त्यामुळे प्रस्तूत अध्ययनात निवडलेल्या बालकामगारांपैकी किती बालकामगारांचे वडील काम करतात आणि बालकामगारांचे वडील काम करीत नाही हे पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ४.२ मध्ये बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे विवरण स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.२**

**बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे विवरण.**

| अ. क्र. | बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे विवरण | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | वडील काम करतात. | १८९ | ९२.६ |
| २. | वडील काम करत नाहीत. | १५ | ७.४ |
| ३. | **एकूण** | **२०४** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **५६** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे विवरण दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.२**

**बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे विवरण**



तक्ता क्र. ४.२ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या वडीलांची कामाची पातळी दर्शविली आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ९२.६% बालकामगारांचे वडील काम करतात. आणि ७.४% बालकामगारांचे वडील काम करत नाहीत. ज्या कुटूंबात त्यांचे वडील काम करत नाहीत त्या कुटूंबात या बालकामगारांना काम करण्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. काम करत असल्याने त्या कुटूंबातील बालकामगारांनी शाळा देखील सोडलेली आहे. काम करणे ही त्यांची मजबूरी आहे. त्याचप्रमाणे ज्या कुटूंबात वडील काम करत आहेत त्या कुटूंबात बालकामगारांना देखील काम करावे लागत आहे याची अनेक कारणे आहेत जसे, वडीलांचे कमी उत्पन्न, कुटूंब सदस्य संख्या जास्त, गरीबी, दारुचे व्यसन, इतर व्यसन वगैरे. काही कुटूंबात वडील काम करत आहेत परंतू त्यांचे उत्पन्न सर्व दारुमध्ये, जुगारामध्ये व इतर व्यसनामध्ये खर्च होते. म्हणून घरामध्ये आर्थिक मदत करण्यासाठी बालकामगारांनाही काम करावे लागते. लागू नसलेले ५६ बालकामगार आहेत.

## ४.३ बालकामगारांच्या मातांचे कामाचे विवरण :

निवडलेल्या बालकामगारांपैकी जवळपास ९८ टक्के बालकामगारांचे मातासुद्धा काम करत असूनही तेथे बालकांना काम करावे लागत आहे ही खेदाची गोष्ट आहे. त्यामुळे प्रस्तूत अध्ययनात निवडलेल्या बालकामगारांपैकी किती बालकामगारांचे माता काम करतात आणि बालकामगारांचे माता काम करीत नाही हे पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ४.३ मध्ये बालकामगारांच्या मातांचे कामाचे विवरण स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र.४.३**

**बालकामगारांच्या मातांचे कामाचे विवरण.**

| अ. क्र. | बालकामगारांच्या मातांचे कामाचे विवरण | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | माता काम करतात. | २४५ | ९८.० |
| २. | माता काम करत नाहीत. | ५ | २.० |
| ३. | **एकूण** | **२५०** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **१०** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या मातांचे कामाचे विवरण दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.३**

**बालकामगारांच्या मातांचे कामाचे विवरण**




तक्ता क्र. ४.३ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या मातांची कामाची पातळी दर्शविली आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ९८.०% बालकामगारांची माता काम करतात. २.०% बालकामगारांची माता हया काम करत नाहीत. बालकामगारांच्या वडीलांच्या काम करण्याच्या तुलनेत बालकामगारांच्या मातांचे काम करण्याचे प्रमाण जास्त आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे बालकामगारांच्या कुटूंबातील पुरुषांना असलेले व्यसन. व्यसनामुळे ते घरात खर्चासाठी पैसे देत नाही. म्हणून पोट भरण्यासाठी मातांना काम करावे लागते. काही पुरुष मंडळी काम तर करतात परंतू त्यांचे नियमित काम नसते. काही कुटूंबात तर पुरुषांना जेव्हा काम असेल तेव्हा उत्पन्न मिळते. जास्तकरुन अशा कुटूंबातील पुरुष मंडळी बिगारी, पेंटर, कारपेंटर वगैरे काम आहेत. परंतू हे काम नियमित नसते. म्हणून मातांना काम करावे लागते. लागू नसलेले १० बालकामगार आहेत.

## ४.४ बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या कामाचे विवरण :

निवडलेल्या बालकामगारांपैकी जवळपास ९०–९८ टक्के बालकामगारांचे आईवडील काम करत असूनही तेथे इतर व्यक्तींनाही काम करावे लागते यामध्ये बालकांचाही समावेश

आहे. ही खेदाची गोष्ट आहे. त्यामुळे प्रस्तूत अध्ययनात निवडलेल्या बालकामगारांपैकी किती बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात हे पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ४.४ मध्ये किती बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे विवरण स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.४**

**बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या कामाचे विवरण.**

| अ.क्र. | कुटूंबातील इतर व्यक्तींच्या कामाचे विवरण | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | काम करतात. | ७४ | १००.० |
| | लागू नाही. | १८६ | |
| | एकूण | २६० | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

वरील तक्ता क्र. ४.४ मध्ये बालक व बालिका कामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या कामाचे विवरणाचे सहसंबंध स्पष्ट केले आहे. यामध्ये ७४ बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्ती काम करतात असे स्पष्ट झाले आहे.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे विवरण दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.४**

**बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे विवरण**



तक्ता क्र. ४.४ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींची कामाची पातळी दर्शविली आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ७४ बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीसुद्धा काम करतात. कारण कुटूंबातील सदस्य संख्या जास्त असल्याकारणाने आणि उत्पन्न कमी असल्यामुळे इतर व्यक्तींनाही काम करावे लागत आहे. लागू नसलेले १८६ बालकामगार आहेत.

## ४.५ बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुप :

बालकामगारांचे आईवडील काम करतात किंवा नाही हे पाहिल्यानंतर ते कोणत्या स्वरुपाचे काम करतात हे पाहणे देखिल महत्वाचे आहे. कारण त्यांच्या कामाचा दर्जा जर चांगला असेल तर बालकांना काम करावे लागत नाही. निवडलेल्या जवळपास सर्व बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे असे आढळून आले आहे. पुढील तक्ता क्र. ४.५ मध्ये बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.५**

**बालकामगारांच्या वडीलांच्या कामाचे स्वरुप**

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बिगारी | ४६ | २४.३ |
| २. | मजूरी | ३० | १५.९ |
| ३. | कचरा वेचणे | ११ | ५.८ |
| ४. | हॉटेल | १५ | ७.९ |
| ५. | हमाल | ५ | २.६ |
| ६. | ड्रायव्हर | १ | ०.५ |
| ७. | बिडी बनविणे | ४ | २.१ |
| ८. | वॉचमन | ५ | २.६ |
| ९. | नोकरी | ९ | ४.८ |
| १०. | वस्तू विकणे | १० | ५.३ |
| ११. | विटभट्टी | ५ | २.६ |
| १२. | शेती | ३ | १.६ |
| १३. | सुतार | ३० | १५.९ |
| १४. | कारखाना | २ | १.१ |
| १५. | झाडू मारतात | १ | ०.५ |
| १६. | दुध डेअरी | १ | ०.५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | पिठाची गिरणी | २ | १.१ |
| १८. | पेंटर | ९ | ४.८ |
| | **एकूण** | **१८९** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **७१** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुप दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.५**

**बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुप**




तक्ता क्र. ४.५ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या वडीलांचे कामाचे स्वरुप दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये २४.३% बालकामगाराचे वडील बिगारीचे काम करत आहेत. १५.९% बालकामगारांचे वडील मजूरी करत आहेत. ५.८% बालकामगारांचे वडील कचरा वेचण्याचे काम करत आहेत. ७.९% बालकामगारांचे वडील हॉटेल मध्ये काम करत आहेत. २.६% बालकामगारांचे वडील हमाली करत आहेत. ०.५ % बालकामगारांचे वडील ड्रायव्हरचे काम करत आहेत. २.१% बालकामगारांचे वडील बिडी बनविण्याचे काम करत आहेत. २.६% बालकामगारांचे वडील वॉचमन म्हणून काम करत आहेत. ४.८% बालकामगारांचे वडील नोकरी करत आहेत. ५.३% बालकामगारांचे वडील वस्तू विकतात. २.

६% बालकामगारांचे वडील विटभट्टीत काम करत आहेत. १.६% बालकामगारांचे वडील शेती करत आहेत. १५.९% बालकामगारांचे वडील सुताराचे काम करत आहेत. १.१% बालकामगारांचे वडील कारखान्यात काम करत आहेत. ०.५% बालकामगारांचे वडील झाडू मारण्याचे काम करत आहेत. ०.५% बालकामगारांचे वडील दुध डेअरी मध्ये काम करत आहेत. १.१% बालकामगारांचे वडील पिठाच्या गिरणीत काम करत आहेत. ४.८% बालकामगारांचे वडील पेंटरचे काम करत आहेत. यावरुन हे लक्षात येते की, बालकामगाराच्या वडीलांचा कामाचा दर्जा तेवढा वरच्या दर्जाचा नाही. कामाच्या स्वरुपावरुन हे लक्षात येते की मिळणारे वेतन हे जास्त नाही. वाढत्या महागाईमुळे कुटूंबाचा खर्च चालवण्यासाठी बालकामगारांनाही काम करावे लागत आहे. लागू नसलेले ७१ बालकामगार आहेत.

## ४.६ बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप :

बालकामगारांचे आईवडील काम करतात किंवा नाही हे पाहिल्यानंतर ते कोणत्या स्वरुपाचे काम करतात हे पाहणे देखिल महत्वाचे आहे. कारण त्यांच्या कामाचा दर्जा जर चांगला असेल तर बालकांना काम करावे लागत नाही. निवडलेल्या जवळपास सर्व बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे असे आढळून आले आहे. पुढील तक्ता क्र. ४.६ मध्ये बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.६**

**बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप**

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बिगारी | २ | ०.८ |
| २. | घरकाम | १०२ | ४१.६ |
| ३. | मजूरी | ४ | १.६ |
| ४. | कचरा वेचणे | १९ | ७.८ |
| ५. | हॉटेल | ३ | १.२ |
| ६. | हमाल | ३ | १.२ |
| ७. | बिडी बनविणे | ८५ | ३४.७ |
| ८. | वस्तु विकणे | ५ | २.० |
| ९. | विटभट्टी | ४ | १.६ |
| १०. | आया | २ | ०.८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | शेती | ४ | १.६ |
| १२. | कारखाना | १ | ०.४ |
| १३. | झाडू मारणे | २ | ०.८ |
| १४. | रेल्वेत जेवणाचे डबे देणे | १ | ०.४ |
| १५. | दुध डेअरी | १ | ०.४ |
| १६. | पेंटर | २ | ०.८ |
| १७. | कपडे शिवणे | ५ | २.० |
| | **एकूण** | **२४५** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **१५** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.६**

**बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप**




तक्ता क्र. ४.६ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ०.८%बालकामगारांची माता बिगारीचे काम करत आहेत. ४१.६%बालकामगारांची माता घरकाम करत आहेत. १.६%बालकामगारांची माता मजूरी करत आहेत. ७.८%बालकामगारांची माता कचरा वेचण्याचे काम करत आहेत. १.२%बालकामगारांची माता हॉटेलमध्ये काम करत आहेत. १.२%बालकामगारांची माता हमाल

म्हणून काम करत आहेत. ३४.७%बालकामगारांची माता बिडी बनविण्याचे काम करत आहेत. २.०%बालकामगारांची माता वस्तू विकण्याचे काम करत आहेत. १.६%बालकामगारांची माता विटभट्टीत काम करत आहेत. ०.८%बालकामगारांची माता दवाखान्यात आया म्हणून काम करत आहेत. १.६%बालकामगारांची माता शेती करत आहेत. ०.४%बालकामगारांची माता कारखान्यात काम करत आहेत. ०.८%बालकामगारांची माता झाडू मारण्याचे काम करत आहेत. ०.४%बालकामगारांची माता रेल्वे स्टेशनवर डबे देण्याचे काम करत आहेत. ०. ४%बालकामगारांची माता दुध डेअरीमध्ये काम करत आहेत. ०.८%बालकामगारांची माता पतीसोबत पेंटरचे काम करत आहेत. २.०%बालकामगारांची माता कपडे शिवण्याचे काम करत आहेत. यावरुन हे लक्षात येते की, बालकामगारांच्या मातांचे कामाचे स्वरुप सुद्धा उच्च दर्जाचे नाही. सोलापूरात बिडी उद्योग मोठया प्रमाणात चालतो. या व्यवसायात स्त्रिया घरामध्ये बसून मोठया प्रमाणात बिडया बनवित आहेत. ३४.७% बालकामगारांच्या माता हया बिडी बनविण्याचे करत आहेत. हे प्रमाण अधिक आहे. त्याचप्रमाणे ४१.६% बालकामगारांची माता हया घरकाम करत आहेत. याठिकाणी अडचण हि निर्माण होते की हया माता घरकामात मदत करण्यासाठी आपल्या मुलांमुलींना घेऊन जातात. त्याच्याकडूनही काम करवून घेतात. परंतू बालक–बालिका कामगारांना याठिकाणी काम केल्यामुळे मोबदला मिळत नाही. कारण ते आपल्या आईला मदत करत आहेत. कामाच्या ठिकाणी या बालकामगारांकडून काही चुक झाल्यास त्यांना शिव्या व मारही खावा लागतो. लागू नसलेले १५ बालकामगार आहेत.

### ४.७ बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे स्वरुप :

बालकामगारांचे कुटूंबातील इतर व्यक्ती कोणत्या स्वरुपाचे काम करतात हे पाहणे महत्वाचे आहे. कारण त्यांच्या कामाचा दर्जा जर चांगला असेल तर बालकांना काम करावे लागत नाही. निवडलेल्या जवळपास सर्व बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे स्वरुप निम्न दर्जाचे आहे असे आढळून आले आहे. पुढील तक्ता क्र. ४.७ मध्ये बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ४.७

### बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे स्वरुप

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बिगारी | २ | २.७ |
| २. | घरकाम | २६ | ३५.१ |
| ३. | मजूरी | १ | १.४ |
| ४. | कचरा वेचणे | ९ | १२.२ |
| ५. | हॉटेल | ७ | ९.५ |
| ६. | बिडी बनविणे | २५ | ३३.८ |
| ७. | विटभट्टी | १ | १.४ |
| ८. | शेती | १ | १.४ |
| ९. | पेंटर | १ | १.४ |
| १०. | कपडे शिवणे | १ | १.४ |
| | **एकूण** | **७४** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **१८६** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे स्वरुप दर्शविले आहे.

### आलेख क्र. ४.७

### बालकामगारांच्याकुटूंबातील इतर व्यक्तीचे कामाचे स्वरुप




तक्ता क्र. ४.७ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे कामाचे स्वरुप दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये २.७%बालकामगाराच्या

कुटूंबातील इतरव्यक्ती हे बिगारीचे काम करत आहेत. ३५.१%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे घरकाम करत आहेत. १.४%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे मजूरी करत आहेत. १२.२%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे कचरा वेचण्याचे काम करत आहेत. ९.५%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे हॉटेल मध्ये काम करत आहेत. ३३. ८%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे बिडी बनविण्याचे काम करत आहेत. १. ४%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे विटभट्टीत विटा बनविण्याचे काम करत आहेत. १.४%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे शेती करत आहेत. १.४%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे पेंटरचे काम करत आहेत. १.४%बालकामगाराच्या कुटूंबातील इतरव्यक्ती हे कपडे शिवण्याचे काम करत आहेत. याचा अर्थ असा बालकामगाराच्या कुटूंबातील आर्थिक कमतरतेमुळे इतर व्यक्तींनाही काम करावे लागत आहे. इतर व्यक्तींचे कामाचे स्वरुप पाहिल्यास हे लक्षात येते की त्यांचाही कामाचा दर्जा उच्च दर्जाचा नाही. यातुन मिळणारे वेतन हे बेताचेच आहे. यातून हे स्पष्ट होते की कुटूंबाती सदस्य संख्या जास्त असल्यामुळे उत्पन्नात भर पडेल असे कुटूंब सदस्यांचे मत आहे परंतू कामातून मिळणारे उत्पन्न आणि जीवन चरितार्थ चालविण्यासाठी आवश्यक असणारा पैसा यात बराच फरक दिसून येतो. जास्त अपत्य म्हणजे जास्त कमाई ही बाब येथे चुकीची दिसून येते. घरातील सर्व सदस्य काम करुन त्यांच्या गरीबीत फारसा फरक पडलेला नाही उलट दारिद्रयात वाढझालेली आहे. लागू नसलेले १८६ बालकामगार आहेत.

### ४.८ बालकामगारांच्या वडीलांच्या मासिक उत्पन्नाची पातळी :

कुटूंबाच्या मासिक व वार्षिक उत्पन्नावरुन कुटूंबाची आर्थिक स्थिती तसेच दारिद्र रेषेखालील कुटूंबाचा आढावा घेता येईल. शक्यतो ज्या कुटूंबातील बालक बालमजूरी करतात त्या कुटूंबाचे उत्पन्न जवळपास निम्न असते म्हणजेच हे दारिद्रय रेषेखालील कुटूंब असते. प्रस्तुत पाहणीमध्ये असे आढळून आले आहे बालकामगारांच्या वडीलांना मिळणारे उत्पन्न हे अतिशय निम्न आहे. पुढील तक्ता क्र. ४.८ मध्ये बालकामगारांच्या वडीलांच्या मासिक उत्पन्नाची पातळी दर्शविली आहे.

### तक्ता क्र. ४.८

### बालकामगारांच्या वडीलांच्या मासिक उत्पनाची पातळी.

| अ.क्र. | उत्पन्न पातळी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ५०० ते १००० रु. | १४ | ७.४ |
| २. | १००१ ते २००० रु. | ९६ | ५०.५ |
| ३. | २००१ ते ३००० रु. | ६२ | ३२.६ |
| ४. | ३००१ ते ४००० रु. | १३ | ६.८ |
| ५. | ४००१ ते ५००० रु. | ४ | २.१ |
| ६. | ५००१ ते ६००० रु. | १ | ०.५ |
| | **एकूण** | **१९०** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **७०** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या वडीलांच्या उत्पनाची पातळी दर्शविले आहे.

### आलेख क्र. ४.८

### बालकामगारांच्यावडीलांच्या मासिक उत्पनाची पातळी



तक्ता क्र. ४.८ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या वडीलांची उत्पन्नाची पातळी दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ७.४%बालकामगाराच्या वडीलांचे उत्पन्न हे ५०० रु. ते १०००रु. इतके आहे. ५०.५%बालकामगाराच्या वडीलांचे उत्पन्न हे १००१ रु. ते २००० रु इतके आहे. ३२.६%बालकामगाराच्या वडीलांचे उत्पन्न हे २००१रु ते ३००० रु. इतके आहे. ६.८%बालकामगाराच्या वडीलांचे उत्पन्न हे ३००१ रु. ते ४००० रु. इतके आहे. २.१%बालकामगाराच्या वडीलांचे उत्पन्न हे ३००१ रु. ते ४००० रु. इतके आहे. ०. ५%बालकामगाराच्या वडीलांचे उत्पन्न हे ५००० रु. ते ६००० रु. इतके आहे. याचा अर्थ असा की बालकामगारांच्या वडीलांच्या उत्पन्नाची पातळी ही अतिशय कमी आहे. बालकामगाराचे कुटूंब हे गरीब आहेत. कुटूंबाची सदस्य संख्या जास्त आहे. शिवाय या कुटूंबातील बहूतांश लोकांचे स्वत:चे घर नाही. म्हणजेच ते भाडयाच्या घरात राहतात. वर्तमानात घराचे भाडे बऱ्याच प्रमाणात जास्त आहे. म्हणून झोपडपट्टी, वस्त्यामध्ये राहतात. दाट लोकसंख्येमुळे वस्त्यामधील परिसर दुशित आणि घाणेरडा बनतो. घाणेरडया वस्तीचा परिणाम या कुटूंबाच्या आरोग्यावर पडतो. परिणामी सतत वेगवेगळया आजारांचा सामना करावा लागतो. त्याचप्रमाणे एवढया उत्पन्नात भाडे भरुन जीवन चरितार्थ चालविणे मुश्किलीचे बनते. परिणामी घरातील इतर व्यक्तींना बालकांसहित काम करावे लागते.

याशिवाय एक महत्वाची गोष्ट म्हणजे पुरुष मंडळींना असलेले व्यसन. बऱ्याच पुरुषांना दारुचे, जुगाराचे वगैरे व्यसन आहे. बऱ्याच बालकामगाराचे वडील आपल्या उत्पन्नाचा पैसा हे व्यसनात खर्च करीत आहेत. परिणामी कुटूंब चालविणे आणखीनच मुश्किलीचे बनते. म्हणून बालकामगाराच्या मातांना व इतर व्यक्तींना बालकामगारांसहीत काम करणे हि त्यांची मजबूरी बनते.

शिक्षण व विशेष कौशल्याच्या कमतरतेमुळे बालकामगारांच्या वडीलांना मिळेल ते काम करावे लागते. आणि मिळणारे काम हे नियमित नसते परिणामी उत्पन्नाचा दर्जा खालावतो. खरे पाहिले तर ही बाब बालकामगाराच्या वडीलांना समजायला पाहिजे की आपण योग्य शिक्षण, कौशल्य आत्मसाद न केल्यामुळे आपल्यावर हि वेळ आली आहे. तर आपण आपल्या मुलांना शिक्षण, विशेष कौशल्य देवून त्याला योग्य नागरीक बनवायला पाहिजे जेणेकरुन मोठा

झाल्यावर तो आपल्या पायावर उभा राहिल आणि बिकट परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. परंतू परिस्थितीवश ते याचा सारासार विचार करत नाहीत. परिणामी बालकामगारांच्या संख्येत वृद्धी होतानाचे दिसते. लागू नसलेले ७० बालकामगार आहेत.

### ४.९ बालकामगारांच्या मातांची मासिक उत्पन्नाची पातळी :

प्रस्तुत पाहणीमध्ये असे आढळून आले आहे बालकामगारांच्या मातांना मिळणारे उत्पन्न हे अतिशय निम्न आहे. पुढील तक्ता क्र. ४.९ मध्ये बालकामगारांच्या मातांची मासिक उत्पन्नाची पातळी दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ४.९**

**बालकामगारांच्या मातांची मासिक उत्पन्नाची पातळी.**

| अ.क्र. | उत्पन्न पातळी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ५०० ते १००० रु. | १०५ | ४२.९ |
| २. | १००१ ते २००० रु. | १३५ | ५५.१ |
| ३. | २००१ ते ३००० रु. | ५ | २.० |
| | **एकूण** | **२४५** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **१५** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या मातांची उत्पन्नाची पातळी दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.९**

**बालकामगारांच्यामातांची उत्पन्नाची पातळी**



तक्ता क्र. ४.९ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या मातांची उत्पन्नाची पातळी दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ४२.९%बालकामगारांच्या मातांचे उत्पन्न हे ५०० रु. ते १००० रु. इतके आहे. ५५.१%बालकामगारांच्या मातांचे उत्पन्न १००१रु. ते २००० रु. इतके आहे. आणि २.०%बालकामगारांच्या मातांचे उत्पन्न हे २००१ रु. ते ३००० रु. इतके आहे. याचा अर्थ असा की, बालकामगारांच्या मातांना मिळणारे उत्पन्न हे अतिशय अल्प आहे. जवळपास निम्म्यापेक्षा जास्त बालकामगारांच्या माता हया अशिक्षित आहेत. शिक्षणाच्या आणि विशेष कौशल्याच्या अभावी त्यांना घरकाम करणे, कचरा वेचणे, बिडया बनविणे वगैरे प्रकारचे काम करावे लागत आहे. या कामात बऱ्याच प्रमाणात श्रम करावे लागते. परंतू केलेल्या श्रमाच्या मोबदल्यात मिळणारे उत्पन्न हे अत्यल्प आहे. शिवाय बऱ्याच पुरुष मंडळींना व्यसनाची सवय असल्यामुळे ते घरखर्चासाठी योग्य पैसा देत नाही. परिणाम या तुटपुंज्या उत्पन्नावर या मातांना घर चालवावयाचे असते. म्हणून घरात आर्थिक मदत करण्यासाठी काही बालकामगारांना मजबूरीने काम करावे लागत आहे.

राहण्याचा परिसर घाणेरडा असल्याने, पोटभर जेवण मिळत नसल्याने, घरात रोजचे भांडणतंटे होत असल्याने, पौष्टीक जेवण मिळत नसल्याने, जास्त श्रम करावे लागत असल्याने बऱ्याच बालकामगाराच्या माता हया सतत आजारी पडत असतात. याचा परिणाम जास्त करुन बालिका कामगारांवर होत असतो कारण त्यांना आईला घरकामात मदत करायचे असते आणि बाहेर जावून कामही करावयाचे असते.

घरकाम करणाऱ्या आणि बिडी बनविणाऱ्या मातांसोबत त्यांचे मुले मदत करण्यासाठी जात आहेत. ते आईला आपल्या कामात मदत करतात म्हणून त्यांना वेगळे उत्पन्न मिळत नाही. हे बालकामगार श्रम तर करतात परंतू त्याचा त्यांना मोबदला मिळत नाही. हे एक प्रकारचे आर्थिक शोषणच आहे. उत्पन्न कमी असल्यामुळे या बालकामगारांच्या कुटूंबाच्या दारिद्रयात आणखीनच भर पडत असते. परिणाम हे दारिद्रयाचे दृष्चक्र असेच वाढत जाते. लागू नसलेले १५ बालकामगार आहेत.

### ४.१० बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या मासिक उत्पन्नाची पातळी :

प्रस्तुत पाहणीमध्ये असे आढळून आले आहे बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींना मिळणारे उत्पन्न हे अतिशय निम्न आहे. पुढील तक्ता क्र. ४.१० मध्ये बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या मासिक उत्पन्नाची पातळी दर्शविली आहे.

**तक्ता क्र. ४.१०**

**बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या मासिक उत्पन्नाची पातळी.**

| अ.क्र. | उत्पन्न पातळी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ५०० ते १००० रु. | ३६ | ४८.६ |
| २. | १००१ ते २००० रु. | ३७ | ५०.० |
| ३. | २००१ ते ३००० रु. | १ | १.४ |
| | **एकूण** | **७४** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **१८६** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या मासिक उत्पन्नाची पातळी दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.१०**

**बालकामगारांच्याकुटूंबातील इतर व्यक्तींच्या मासिकउत्पन्नाची पातळी**



तक्ता क्र. ४.१० मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींच्या उत्पन्नाची पातळी दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ४८.६% बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे उत्पन्न हे ५०० रु. ते १००० रु. इतके आहे. ५०. ०%बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे उत्पन्न हे १००१ रु. ते २००० रु. इतके आहे. आणि केवळ १.४% बालकामगारांच्या कुटूंबातील इतर व्यक्तींचे उत्पन्न हे २००१रु. ते ३००० रु. इतके आहे. याचाच अर्थ जवळपास ९८% बालकामगारांच्या कुटूंबातील व्यक्तींचे उत्पन्न हे अत्यल्प आहे. म्हणजे घरातील सर्व सदस्य काम करुनही त्यांची आर्थिक स्थिती कमकुवतच आहे. लागू नसलेले १८६ बालकामगार आहेत.

## ४.११ बालकामगारांचे काम करण्याचे स्वरुप :

बालकामगार प्रामुख्याने हॉटेल, उद्योग, बिडी उद्योग, घरकाम, बांधकाम क्षेत्र वगैरे क्षेत्रात काम करतात. त्यांचे काम करण्याचे स्वरुप कसे आहे. याबाबतचा आढावा घेणे महत्वाचे आहे. असे कोणते व्यवसाय उद्योग आहेत जेथे बालकामगारांना मोठी मागणी आहे. सोलापूरात बिडी उद्योग मोठया प्रमाणात चालतो. अध्ययनात बरेच बालकामगार बिडी बनविणे व घरकाम, हॉटेल मध्ये काम करतानाचे आढळले. बिडी बनविणे व घरकामात बहूतांशी बालिका कामगार आढळल्या. प्रस्तूत अध्ययनात असे आढळले आहे की, बालकामगारांचे कामाचे स्वरुप देखिल निम्न दर्जाचे आहे. कारण त्यांच्या जवळ योग्य शिक्षण, प्रशिक्षण नाही. पुढील तक्ता क्र. ४. २० मध्ये बालकामगारांचे काम करण्याचे स्वरुप स्पष्ट केले आहे.

### तक्ता क्र. ४.११

### बालकामगारांचे काम करण्याचे स्वरुप

| अ.क्र. | बालकामगाराचे कामाचे स्वरुप | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | कचरा वेचणे | ३० | ११.५ |
| २. | सिझनल काम | १ | ०.४ |
| ३. | वस्तू विकणे | २ | ०.८ |
| ४. | मजूरी | ६ | २.३ |
| ५. | सुतार | ५ | १.९ |
| ६. | शेती | ६ | २.३ |
| ७. | भंगार | ३ | १.२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | दोरी विणणे | ५ | १.९ |
| ९. | खाटीक | २ | ०.८ |
| १० | भेळ गाडी | ५ | १.९ |
| ११. | पिठाची गिरणी | २ | ०.८ |
| १२. | बिडया बनविणे | ६७ | २५.८ |
| १३. | दुध घरी नेऊन देणे | २ | ०.८ |
| १४. | कपडे शिवणे | ३ | १.२ |
| १५. | चायनिज गाडीवर काम | २३ | ८.८ |
| १६. | घरकाम | ३८ | १४.६ |
| १७. | विटभट्टी | २२ | ८.५ |
| १८. | कारखाना | ३ | १.२ |
| १९. | बिगारी | १३ | ५.० |
| २०. | हॉटेल | १९ | ७.३ |
| २१. | गॅरेज | ३ | १.२ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचे काम करण्याचे स्वरुप दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.११**

**बालकामगारांचे काम करण्याचे स्वरुप**



तक्ता क्र. ४.११ मध्ये अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगाराचे कामाचे स्वरुप दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ११.५%बालकामगार हे कचरा वेचण्याचे काम करत आहेत. कचरा वेचण्यासाठी हे बालकामगार सकाळी लवकरच घरातून जातात. कचरा कुंडीतून त्यांना हव्या त्या वस्तू जमा करीत असतात. हे काम करीत असताना त्यांना वेगवेगळया समस्यांचा सामना करावा लागतो. जसे कचरा कुंडीत काचा, गंजलेल्या वस्तू, इंजेक्शनच्या सुया वगैरे असतात. या वस्तू लागून त्यांना दुखापत होते. परिणामी खरचटणे, घाव लागणे, धनुर्वात होणे वगैरे समस्यांचा सामना करावा लागतो. घाणीत वस्तू वेचण्यामुळे त्यांना श्वसनाचा आजार, इन्फेक्शन होण्याचा संभव असतो. ०.४%बालकामगार हे सिझनल काम करत आहेत. ०.८%बालकामगार हे वेगवेगळे वस्तू विकण्याचे काम करत आहेत. २.३%बालकामगार हे मजूरी करत आहेत. १.९%बालकामगार हे सुताराचे काम करत आहेत. २.३%बालकामगार हे शेती करत आहेत. १.२%बालकामगार हे भंगार गोळा करण्याचे काम करत आहेत. १.९%बालकामगार हे दोरी विणण्याचे काम करत आहेत. ०.८%बालकामगार हे खाटीक म्हणून मटनाच्या दुकानात व कत्तलखान्यात काम करत आहेत. १.९%बालकामगार हे भेळ गाडीवर भेळ देणे, बशी टेबल साफ करणे, पाणी देणे वगैरे प्रकारचे काम करत आहेत. ०.८%बालकामगार हे पिठाची गिरणीमध्ये काम करत आहेत. २५.८%बालकामगार हे बिडया बनविण्याचे काम करत आहेत. यात बालिका कामगारांची संख्या सर्वात जास्त आहे. बिडया हया बसून बनवितात. सतत मांडी घालून बसण्याने त्यांना पाठीच्या मणक्याचा त्रास होत असतो. या कामातून मिळणारा मोबदला खूपच कमी आहे. काही ठिकाणी तर मालकवर्ग जेव्हा बिडया बनवून देतात तेव्हा त्यांची फसवणूक करतात. जाणून बूजून चांगल्या बिडयांना वाईट आहेत म्हणून त्यांची फसवणूक करतात. याठिकाणी बालकामगारांना सतत तंबाकूच्या संपर्कात राहावे लागत असल्याने त्यांना वेगवेगळया आजारांचा सामना करावा लागतो. ०.८%बालकामगार हे घरोघरी जावून दुध देण्याचे काम करतात. १.२%बालकामगार हे कपडे शिवण्याचे काम करतात. यातही बालिका कामगार अधिक आहेत. ते हातशिलाई करणे, काज्या बटन लावणे, हुक्क लावणे वगैरे प्रकारचे काम करतात. ८.८%बालकामगार हे चायनिज गाडयावर काम करतात. सोलापूरात ठिकठिकाणी चायनिज गाडया आहेत. त्या ठिकाणी ग्राहकांच्या ऑर्डरप्रमाणे वस्तु देणे, पाणी देणे, टेबल साफ करणे, भांडी धुणे वगैरे प्रकारचे काम

करतात. १४.६%बालकामगार हे घरगुती नोकर म्हणून काम करत आहेत. यामध्येही बालिका कामगार अधिक आहेत. काही बालकामगार हे आपल्या आईल घरगुती कामात मदत करण्याकरीता जातात. बालकामगारही श्रम करीत आहेत परंतू ते आपल्या आईला कामात मदत करत आहेत म्हणून त्यांना वेतन मिळत नाही. काही कामाच्या ठिकाणी पुरुषांकडून त्यांचे लैंगिक शोषण होण्याची शक्यता असते. ८.५%बालकामगार हे विटभट्टीत विटा बनविण्याचे काम करतात. या ठिकाणी त्यांना माती कालवावी लागते. कच्च्या विटांना पक्के करण्यासाठी भर मांडावा लागतो. पक्क्या झाल्यावर ते गाडीत चढवावे लागते. त्याचप्रमाणे विटा पक्क्या करण्यासाठी त्यांना तापवावे लागते. त्यामुळे बालकामगारांना तापत्या भट्टीचाही सामना करावा लागतो, कामाच्या ठिकाणी माती, धूळ असते ती त्याच्या श्वासाद्वारे शरीरात जाते त्यामुळे त्यांना श्वसनाचा आजार, डोळयांचा आजार, चटका लागणे, त्वचेचा आजार वगैरेचा सामना करावा लागतो. त्याचबरोबर विटा चढवणे, उतरवणे यामुळे पाय दुखणे, हाडे दुखणे वगैरे समस्येचाही सामना करावा लागतो. १.२%बालकामगार हे कारखान्यात काम करतात. ५.०%बालकामगार हे बिगारीचे काम करतात. कामाच्या ठिकाणी त्यांना वाळू, सिमेंट वगैर नेवून देणे, बांधकामावरची माती काढणे वगैरे प्रकारचे काम करावे लागते. कामाच्या माती, धूळ असल्यामुळे श्वासाद्वारे ते बालकामगारांच्या शरीरात जातात. परिणामी बालकामगारांना श्वसनाचा, दम्याचा आजारांना सामना करावा लागतो. त्याचप्रमाणे बांधकामावर सळई, तारा वगैरे असतात त्या लागल्याने त्यांना दुखापत होते, धनुर्वात वगैरे होण्याचा संभव असतो. बांधकामाचा परिसर स्वच्छ नसतो, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसते त्यामुळे वेगवेगळया आजारांचाही सामना करावा लागतो. वयस्क कामगारांकडून शिव्या खाणे, प्रसंगी मार खाणे वगैरे समस्यांचा सामना करावा लागतो. त्याचप्रमाणे कामाचा मोबदलाही त्यांना वयस्कांच्या तुलनेत खूप कमी दिला जातो. हे एक प्रकारचे बालकामगारांचे शोषण आहे. म्हणजे या कामात बालकामगाराचे शारिरीक, मानसिक, आणि आर्थिक शोषण होत असते. ७.३%बालकामगार हे हॉटेल मध्ये काम करतात. त्या ठिकाणी त्यांना ऑर्डर प्रमाणे वस्तू देणे, टेबल साफ करणे, पाणी देणे, भांडी घासणे वगैरे प्रकारचे काम करावे लागते. चुकून काही वस्तू पडल्यास, किंवा काम व्यवस्थित व वेळेवर न झाल्यास त्यांना शिव्या व मारही खावा लागतो. काम केल्यानंतर त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला अत्यल्प मिळतो. म्हणजेच याठिकाणीही बालकामगारांचे

मानसिक, शारिरीक आणि आर्थिक शोषण होत असते. काही मालक तर त्यांना वेतन देत नाही त्याबदल्यात त्यांना दोन वेळेचे जेवण देतो. काही बालकामगार हे घर सोडून आलेले असतात ते सकाळपासून रात्रीपर्यंत काम करुन तिथे झोपत असतात. १.२%बालकामगार हे गॅरेज मध्ये काम करतात. या ठिकाणी त्यांना गाडया साफ करणे, नटबोल्ड टाईट करणे वगैरे प्रकारचे काम करावे लागते. याठिकाणी काही विषारी केमीकलचाही वापर होतो. काम करत असताना कधी कधी त्यांना दुखापत होते.

### ४.१२बालकामगारांना काम करताना मिळणाऱ्या वेतनाचा कालावधी :

साधारणत: कामाचा आर्थिक मोबदला अर्थात मजूरी ही आठवडयाला किंवा महिन्याला मिळत असते. प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या बालकामगारांना कामाचा मोबदला कधी मिळतो या बाबींचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. अर्थात बालकामगारांना मिळणारी मजूरी किती दिवसांनी मिळते याबाबतचा तपशिल पुढील तक्ता क्र. ४.१२ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.१२**

**बालकामगारांना काम करताना मिळणाऱ्या वेतनाचा कालावधी.**

| अ.क्र. | वेतन मिळण्याचा कालावधी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | छररोज | ९१ | ४१.२ |
| २. | आठवडा | ९९ | ४४.८ |
| ३. | छरमहा | २८ | १२.७ |
| ४. | प्रति नग | ३ | १.४ |
| | **एकूण** | **२२१** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **३९** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांना काम करताना मिळणाऱ्या वेतनाच्या कालावधी दर्शविले आहे.

### आलेख क्र. ४.१२

### बालकामगारांना काम करताना मिळणाऱ्या वेतनाचा कालावधी




तक्ता क्र. ४.१२ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांना कामाचा मोबदला केव्हा मिळतो हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ४१.२% बालकामगारांना कामाचा मोबदला दररोज मिळतो. ४४.८% बालकामगारांना कामाचा मोबदला हा आठवडयाने मिळतो. १२.७% बालकामगारांना दरमहा मोबदला मिळतो. आणि १.४% बालकामगारांना प्रति नगांवर मोबदला मिळतो. ज्या बालकामगारांना दररोज मोबदला मिळतो त्यामध्ये प्रामुख्याने कचरा वेचणे, भंगार गोळा करणे, चायनिज गाडी, भेळ गाडी वर काम केल्याने प्रतिदिन प्रमाणे मोबदला मिळतो. ज्या बालकामगारांना आठवडयात मोबदला मिळतो त्यामध्ये बिगारी, हॉटेल काम, बिडी बनविणे वगैरे आहे. घरगुती नोकर, दुकानात, कारखान्यात, गॅरेज वगैरेमधील काम करणाऱ्या बालकामगारांना दरमहा वेतन मिळते. ज्या बालकामगारांना दररोज मोबदला मिळतो ते आपल्या उत्पन्नातील काही पैसा घरात देतात आणि बाकीचा पैसा स्वत:वर खर्च करतात. काही बालकामगार यातून जूगार खेळणे वगैरेमध्ये पैसा खर्च करतात. आपल्या बरोबरीच्या मित्राला काम केल्यामुळे रोज पैसे मिळतात व त्याला पाहिजे तसा पैसा खर्च करु शकतो. हे पाहून इतर मुले आपणही काही काम करावे या प्रेरणे मजूरी करण्यासाठी तयार होतात. म्हणजेच बालकामगारांच्या संख्येत वृद्धी होत जाते. घरात गरीबीमुळे खर्चाला पैसे देत नाही म्हणून ही

बालके मजूरीचा मार्ग अवलंबतात. हातात पैसे मिळत असल्याने यांना व्यसनाची सवयही लागू शकते. लागू नसलेले ३९ बालकामगार आहेत.

### ४.१३बालकामगारांना काम करताना मिळणारे वेतन :

साधारणत: बालकामगारांना अतिशय कमी मजूरी दिली जाते. बालकामगारांची हालाखिची परिस्थिती असल्यामुळे बालकामगार कमी वेतनावर काम करतात. बालकामगारांना मिळणाऱ्या वेतनाबाबतचा तपशिल पुढील तक्ता क्र. ४.१३ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.१३**

**बालकामगारांना काम करताना मिळणारे वेतन.**

| अ.क्र. | वेतन (प्रतिदिन) | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | २० रु. पर्यंत | ४३ | १९.५ |
| २. | २१ ते ४० रु. | ९६ | ४३.४ |
| ३. | ४१ ते ६० रु. | ३३ | १४.९ |
| ४. | ६१ ते ८० रु. | २६ | ११.८ |
| ५. | ८१ ते १०० रु. | १५ | ६.८ |
| ६. | १०१ ते १२० रु. | २ | ०.९ |
| ७. | १२१ ते १४० रु. | ३ | १.४ |
| ८. | १४१ ते १६० रु. | ३ | १.४ |
| | **एकूण** | **२२१** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **३९** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांना काम करताना मिळणारे वेतन दर्शविले आहे.

## आलेख क्र. ४.१३

### बालकामगारांना काम करताना मिळणारे वेतन




तक्ता क्र. ४.१३ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांना कामाचा किती मोबदला मिळतो हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये १९.५% बालकामगारांना प्रतिदिन प्रमाणे २०रुपयांपर्यत मोबदला मिळतो. ४३.४% बालकामगारांना प्रतिदिन प्रमाणे २१ रु. ते ४० रुपयापर्यत मोबदला मिळतो. १४.९% बालकामगारांना प्रतिदिन प्रमाणे ४१ रु. ते ६० रुपयांपर्यंत मोबदला मिळतो. ११.८% बालकामगारांना प्रतिदिन प्रमाणे ६१ रु. ते ८० रुपयांपर्यंत मोबदला मिळतो. ६.८% बालकामगारांना प्रतिदिन प्रमाणे ८१ रु. ते १०० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते. ०.९% बालकामगारांना प्रतिदिन प्रमाणे १०१ रु. ते १२० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते. १.४% बालकामगारांना प्रतिदिन प्रमाणे १२१ रु. ते १४० रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते. १.४% बालकामगारांना प्रतिदिन प्रमाणे १४१ रु. ते १६० रुपये इतके उत्पन्न मिळते. याचा अर्थ जवळपास निम्म्यापेक्षा जास्त (५३.४%) बालकामगारांना कामातून मिळणारे उत्पन्न अत्यल्प आहे. हे बालकामगार जवळपास ८ ते १० तास काम करतात बदल्यात मिळणारे उत्पन्न खूप कमी आहे म्हणजेच त्यांचे आर्थिक शोषण होत आहे. लागू नसलेले ३९ बालकामगार आहेत.

## ४.१४ बालकामगारांना अतिरिक्त काम केल्यामुळे मिळणारे उत्पन्न :

कोणत्याही क्षेत्रात, व्यवसायात किंवा उद्योगात कामगारांनी त्यांच्या नियमित कामाच्या व्यतिरिक्त जास्तीचे काम केले तर त्याला अतिरिक्त कामाचा मोबदला मिळणे आवश्यक आहे. तशा प्रकारची कायद्यात तरतुद आहे. प्रस्तुत पाहणीतील बहूतांशी बालकामगार कामाच्या ठिकाणी अनेकवेळा अतिरिक्त काम करतात. परंतू या बालकामगारांना अतिरिक्त कामाचा मोबदला मिळतो का?याबाबतचा तपशिल पुढील तक्ता क्र. ४.१४ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.१४**

**बालकामगारांना अतिरिक्त काम केल्यामुळे मिळणारे उत्पन्न.**

| अ.क्र. | अतिरिक्त कामाचे उत्पन्न | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | उत्पन्न मिळत नाही | २०१ | ८८.२ |
| २. | २० रु. पर्यंत | २२ | ९.६ |
| ३. | २१ ते ४० रु. पर्यंत | ५ | २.२ |
| | **एकूण** | **२२८** | **१००.०** |
| | **लागू नसलेले** | **३२** | |
| | **एकूण** | **२६०** | |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांना अतिरिक्त काम केल्यामुळे मिळणारे उत्पन्नदर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.१४**

**बालकामगारांना अतिरिक्त काम केल्यामुळे मिळणारे उत्पन्न.**



तक्ता क्र. ४.१४ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांना ओव्हर टाईम काम केल्यामुळे किती मोबदला मिळतो हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ८८.२% बालकामगारांना ओव्हर टाईम केल्यामुळे मोबदला मिळत नाही. ९.६% बालकामगारांना २० रुपयांपर्यंत मोबदला मिळतो. आणि २.२% बालकामगारांना २१ रु. ते ४० रुपयापर्यंत मोबदला मिळतो. बऱ्याच बालकामगारांकडून जास्त वेळ तर काम करवून घेतले जाते परंतू त्याचा त्यांना मोबदला दिला जात नाही. याचाच अर्थ असा की, हया बालकामगारांचे आर्थिक शोषण होत आहे. काही बालगारांना हेही माहित नाही की, जास्त वेळ काम केल्याने मोबदला मिळत असतो परंतू केवळ अज्ञानामुळे, आणि मजबूरीवश त्यांना हा मोबदला मिळत नाही. लागू नसलेले ३२ बालकामगार आहेत.

### ४.१५ बालकामगारांना मिळण्याऱ्या आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोत :

बहूतांशी बालकामगारांना मजूरी केल्यामुळे त्या मजूरीचा मोबदला मालक वर्गाकडून मिळतो. परंतू असे काही बालकामगार आहेत ज्यांना त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळत नाही. कारण ते आपल्या आईवडीलांना, पालकांना मदत करतात. ते मदत करीत असल्यामुळे त्यांना थेट मोबदला मिळत नाही. त्यामुळे बालकामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोत अभ्यासणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ४.१५ मध्ये हि बाब स्पष्ट केली आहे.

**तक्ता क्र. ४.१५**

**बालकामगारांना मिळण्याऱ्या आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोत.**

| अ.क्र. | आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोत. | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | मलक | २११ | ८१.२ |
| २. | पलक | ३० | ११.५ |
| ३. | आई | ११ | ४.२ |
| ४. | वडील | ६ | २.३ |
| ५. | ठतर | २ | ०.८ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोत दर्शविले आहे.

## आलेख क्र. ४.१५

## बालकामगारांचे आर्थिक सहाय्यतेचे स्त्रोत




तक्ता क्र. ४.१५ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांना मिळणाऱ्या उत्पन्नाचे स्त्रोत दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये ८१.२% बालकामगारांचे उत्पन्न त्यांच्या मालकांकडून मिळते. म्हणजे बालकामगार मालकांकडे काम करतात. कामाच्या मोबदल्यात त्यांना पैसा मिळतो. ११.५% बालकामगारांना त्यांच्या पालकाकडून पैसे मिळतात. ४. २%बालकामगारांना त्यांच्या आईकडून पैसे मिळतात. बरेच बालकामगार हे आपल्या आईला कामात मदत करण्यासाठी काम करतात. २.३% बालकामगारांना त्यांच्या वडीलांकडून पैसे मिळतात. बरेच बालकामगार वडीलांना मदत करण्यासाठी त्यांच्यासोबत काम करतात. ०.८ बालकामगारांना इतरांकडून पैसे मिळतात. जे अनाथ आहेत त्यांचा सांभाळ इतर व्यक्ती करतात. हे बालकामगार त्यांच्याकडे काम करतात. जसे भाज्या चिरुन देणे, जेवणाचे डबे देणे वगैरे.

### ४.१६ बालकामगारांचा स्वत:वरचा खर्च :

अनेक कुटूंबाची आर्थिक परिस्थिती हालाखिची असल्यामुळे त्या घरातील बालकांनाही काम करावे लागते. परंतू असे काही बालकामगार आहेत ज्यांना रोज खर्चाला पैसे घरातून मिळत

नाही. म्हणून रोज खर्चाला पैसे हवेत म्हणून मजूरी करतात. बऱ्याच बालकामगारांना बाहेरचा खाऊ खाणे आवडते, काहींना जुगार खेळणे, लॉटरी काढणे वगैरे व्यसनाची सवय असते त्याकरीता त्यांना पैसे हवे असतात. म्हणून काही बालकामगार मजूरी करतात. दुसरी गोष्ट म्हणजे बालकामगार स्वत: पैसे कमवित असल्यामुळे इतक्या लहान वयात हातात पैसा मिळत असल्याने तो पैसा स्वत:वर खर्च करण्याचा विचार करतात. काही बालकामगार असे आहेत जे स्वत:वर पैसा खर्च करीत नाही सर्व पैसा घरात देतात. प्रस्तुत पाहणीत किती बालकामगार स्वत:वर पैसे खर्च करतात आणि किती खर्च करतात ते पुढील तक्ता क्र. ४.१६ मध्ये स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.१६**

**बालकामगारांचा स्वत:वरचा खर्च.**

| अ.क्र. | स्वत:वरचा खर्च | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | खर्च करत नाहीत | ७३ | २८.१ |
| २. | १० रु. पर्यंत | १३२ | ५०.८ |
| ३. | ११ ते २० रु. पर्यंत | ४३ | १६.५ |
| ४. | २१ ते ३० रु. पर्यंत | ७ | २.७ |
| ५. | ३१ ते ४० रु. पर्यंत | ५ | १.९ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांचा स्वत:वरचा खर्च दर्शविले आहे.

### आलेख क्र. ४.१६

### बालकामगारांचा स्वत:वरचा खर्च




तक्ता क्र. ४.१६ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगार स्वत:वर किती खर्च करतात हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये २८.१%बालकामगार स्वत:साठी काहीही खर्च करीत नाहीत. ५०.८%बालकामगार स्वत:वर प्रतिदिन १० रुपयांपर्यंत खर्च करतात. १६.५%बालकामगार हे स्वत:वर प्रतिदिन ११रु. ते २० रुपयांपर्यंत खर्च करतात. २.७%बालकामगार हे स्वत:वर प्रतिदिन २१ रु. ते ३० रुपयांपर्यंत खर्च करतात. १.९%बालकामगार हे स्वत:वर खर्च करतात. ज्या बालकामगारांना कामाचा मोबदला जास्त मिळतो ते स्वत:वर जास्त खर्च करतात. परंतू ज्या कामगारांची घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे ते आपल्या कमाईचा पुर्ण हिस्सा आपल्या घरात देतात. परंतू काही बालकामगार आपल्या कमाईचा हिस्सा थोडा हिस्सा आपल्या कुटूंबाला देतात आणि बाकीचा हिस्सा स्वत:वर खर्च करतात. परंतू बरेचसे बालकामगार असेही आहेत ज्यांना पान, गुटखा, तंबाखू किंवा बाहेरचे चटरफटर खाण्याची व्यसनाची सवय आहे ते आपला पैसा यावर खर्च करतात.

## ४.१७ बालकामगारांद्वारा केली जाणारी बचत :

पैशाची बचत करणे हे आर्थिक दृष्टीकोनातून अत्यंत चांगली सवय आहे. कारण भविष्यातील कोणत्याही आकस्मिक खर्चासाठी याचा उपयोग केला जाऊ शकतो. त्यामुळे पैशाच्या बचतीस अत्यंत महत्व आहे. सदरील पाहणीतील बालकामगार स्वत: पैसे कमवतात. त्यामुळे ते पैशाची बचत करतात का? हे संशोधनात्मकदृष्टया अभ्यासणे आवश्यक आहे. पुढील तक्ता. क्र. ४.१७मध्ये किती बालकामगार बचत करतात आणि किती नाही हे स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.१७**

**बालकामगारांद्वारा केली जाणारी बचत.**

| अ.क्र. | बचत | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बचत करतात | ६ | २.३ |
| २. | बचत करत नाहीत | २५४ | ९७.७ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये किती बालकामगार बचत करतात किंवा नाही हे दर्शविले आहे.

**आलेख क्र. ४.१७**

**बालकामगारांद्वारा केली जाणारी बचत**



तक्ता क्र. ४.१७ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांद्वारे केली जाणारी बचत दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये केवळ २.३% बालकामगार बचत करतात. आणि ९७.७% बालकामगारांकडून काहीही बचत होत नाही. याचा अर्थ बालकामगारांना जे उत्पन्न मिळते ते एकतर घरात खर्च होते नाही तर स्वत:वर खर्च केला जातो. ९७.७% बालकामगारांकडून काहीही बचत होत नाही. कारण त्यांची घरची परिस्थिती अत्यंत हालाखिची आहे. आणि काही बालकामगारांना बचतीची सवय नसते आणि बऱ्याच बालकामगारांना बचतीचे महत्व माहीत नाही.

## ४.१८ बालकामगारांद्वारा केली जाणारी बचतीची पातळी :

प्रस्तुत पाहतील किती बालकामगार बचत करतात आणि किती बालकामगार बचत करीत नाही हे पाहिल्यानंतर जे बालकामगार बचत करतात त्याचे प्रमाण किती आहे ते पाहणे आवश्यक आहे. पुढील तक्ता क्र. ४.१८ मध्ये बालकामगारांद्वारा केली जाणारी बचतीची पातळी स्पष्ट केले आहे.

**तक्ता क्र. ४.१८**

**बालकामगारांद्वारा केली जाणारी बचतीची पातळी.**

| अ.क्र. | बचतीची पातळी | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बचत करत नाहीत | २५४ | ९७.७ |
| २. | १० रु. पर्यंत | २ | ०.८ |
| ३. | २० रु. पर्यंत | ३ | १.२ |
| ४. | २० रु. च्या जास्त | १ | ०.४ |
| | **एकूण** | **२६०** | **१००.०** |

स्त्रोत : सर्वेक्षण पाहणी.

पुढील आलेखामध्ये बालकामगारांची बचतीची पातळी दर्शविले आहे.

### आलेख क्र. ४.१८

### बालकामगारांद्वारा केली जाणारी बचतीची पातळी




तक्ता क्र. ४.१८ मध्ये अभ्यासासाठी निवडलेले बालकामगारांद्वारे किती बचत केली जाते हे दर्शविले आहे. एकूण २६० बालकामगारांमध्ये जे २.३% बालकामगार बचत करतात त्यापैकी ०.८ बालकामगार हे प्रतिदिन १० रुपये बचत करतात. १.२ बालकामगार हे प्रतिदिन २० रुपये बचत करतात. आणि ०.४ बालकामगार प्रतिदिन २० रुपयांपेक्षा जास्त बचत करतात. एकूण बालकामगारांच्या तुलनेत हे बचतीचे प्रमाण अत्यंत कमी आहे.